



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# मतदानाला काही तास बाकी असताना शरद पवारांनी डाव फिरवला? राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग!



विधानसभा निवडणुकीसाठीच्या मतदानाला आता अवघे काही तास शिल्लक राहीले आहेत, आज प्रचाराच्या तोफा थंडावतील. येत्या वीस नोव्हेंबरला बुधवारी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान आहे. तर तेवीस नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीचा निकाल आहे. 2019 नंतर राज्यात दोन बड्या पक्षात फूट पडली. राष्ट्रवादी आणि शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्षाचे दोन गट झाले. त्यापैकी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटानं भाजपला पाठिंबा दिला आणि सरकारमध्ये सहभागी झाले. राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीपूर्वी शिवसेनेत मोठी फूट पडली होती.

एकनाथ शिंदे यांच्या उठावानंतर उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर एकनाथ शिंदे हे भाजपच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री बनले. दरम्यान या फुटीनंतर राज्यात प्रथमच विधानसभेची निवडणूक होत असल्यानं या निवडणुकीकडे राज्याचं नाही तर देशाचं लक्ष लागलं आहे. राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार येणार की महाविकास आघाडी सरकार स्थापन करणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान यावेळी सर्वच राजकीय पक्षांसमोर दुसरं मोठं आव्हान होतं ते म्हणजे त्या-त्या विधानसभा मतदारसंघातील नाराज नेत्याची समजूत घालून बंडखोरी टाळण्याचं. मात्र अनेक ठिकणी बंडखोर उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवल्यानं महाविकास आघाडी आणि महायुतीमधल्या अधिकृत उमेदवारांचं टेन्शन वाढलं आहे. त्यातच मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता अवघे काही तास शिल्लक असताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांना मोहोळमधील बंडखोरी मोडून काढण्यात यश आलं आहे.

मोहोळ विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजू खरे यांना बंडखोर उमेदवार संजय क्षीरसागर यांनी पाठिंबा दिला आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी संजय क्षीरसागर यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. संजय क्षीरसागर यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने उमेदवारी न दिल्याने ते नाराज होते. त्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र आता त्यांनी राजू खरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे आता मोहोळमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाची ताकत वाढली आहे.

## मराठा सेवकांनी घेतलेला निर्णय योग्य; परिवर्तनासाठी जनतेने अनिल दादांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे : मुकेश रसाळ

बीड(प्रतिनिधी):-मराठा सेवकांनी नारायणगडावर समाजात मतविभागणी होऊ नये म्हणुन घेतलेला निर्णय स्वागतार्ह असुन समाजाला पटलेला,मान्य आहे. धाकटी पंढरी म्हणुन ओळख असलेल्या नारायणगड नगद नारायण महाराज चरणी झालेल्या मराठा सेवकाच्या बैठकीत एकमताने झालेल्या निर्णयानुसार अनिल दादा यांना कौल, आशिर्वाद मिळालेला आहे.तो कुणी मान्य करत नसेल त-हा करत असेल तर त्याने समजुन घ्यावे की कुणी समाजापेक्षा स्वतःला मोठे समजु नये.नारायणगडाचा सन्मान करावा.समाज मोठा आहे व्यक्ती नाही.नारायणगड म्हणजे अठरापगड समाजाचे श्रद्धास्थान,आराध्य आहे.इथे सर्व नगद नारायण महाराजांच्या कृपेने नगद असते. हत्तीचे बळ,ताकद असणा-या मराठा समाजाला महायुती,महाविकास आघाडी कडुन उमेदवारी देण्यात आली नाही.महायुती,महाविकास आघाडीने बीड मतदारसंघात मराठा समाजाला डावलल्यामुळे समाजात दोन्ही पक्षाविषयी घराणेशाही विरुद्ध राग,खदखद आहे.मराठा समाजातील मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी घेतलेल्या कार्यक्रमाला अनिल दादांचे मुकूटमणी सारखे योगदान,काम केलेले आहे.त्यामुळे उबाठा पक्षाने त्यांचे जिल्हाप्रमुख पद काढले.मराठा समाजाच्या मुलांवर खोटे गुन्हे,केसेस झाल्यावर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन त्यांना सोडविण्याचे काम अनिल दादांनी केलेले आपण सर्वांनी पाहिले आहे. बीड मतदारसंघ शिवसेनेच्या हक्काचा मतदारसंघ असताना राष्ट्रवादी पक्षाला जागा सोडुन मुख्यमंत्री राहिलेल्या एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांवर धनुष्यबाण चिन्हावर अन्याय केलेला आहे.शिवसैनिकाना अनाथ केले आहे.हे सर्व शिवसैनिक अनिल दादांच्या पाठीशी उभे



राहिले आहेत. नारायणगड पायथ्याशी,चरणाशी असलेल्या सेवेकरी व मराठा सेवक अनिलदादा हे सर्वसामान्य अठरापगड समाजातील कोणावरही अन्याय झाल्यास त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेले आहेत.त्याच्याकडुन कधी कुणावर अन्याय केल्याचे घर मोडल्याचे, उध्वस्त केल्याचे ऐकण्यात नाही..80%समाजकारण व 20% राजकारण त्यांच्याकडुन होत आलेले आहे.त्यामुळे विशिष्ट घराण्याची मक्तेदारी मोडीत काढण्याचे बीड मतदारसंघावर मारलेली खुटी काढुन बिंदुसरा नदीत फेकण्याचे सामर्थ्य,क्षमता अनिल जगताप यांच्यात आहे हे पाहुनच मराठा सेवकांनी घेतलेला निर्णय मराठा समाजास अठरापगड जनतेला आवडलेला आहे.त्यामुळे मराठा समाजासह अठरापगड,दलित, मुस्लिम समाजाने मतविभागणी न करता त्याच-त्याच व्यक्तीला पुन्हा संधी देण्यापेक्षा 40 वर्षांपासून समाजसेवा करणा-या उपेक्षित आपला,हक्काचा माणुस म्हणुन घराणेशाही मुक्त बीड मतदारसंघ करण्यासाठी आलेली संधी वाया जाऊ न देता अपक्ष उमेदवार अनिल जगताप यांचे अ.क्र.13 वरील शिवणयंत्र चिन्हासमोरील बटन दाबुन भरघोस मताने निवडुन द्यावे असे आवाहन बालाघाटावरील मुकेश रसाळ यांनी केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी दिला मतदार जागृतीचा संदेश



मतदार संघनिहाय तयार केली मानवी साखळी

बीड, दिनांक 18 : लोकशाहीचा धागा हो... मतदार राजा जागा हो..., नागरिकांचे नियत कर्म, मतदान आहे आपला धर्म... अशा घोषणा देत शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी मतदार जागृती केली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सामाजिक न्याय भवन ते क्रीडा संकुल पर्यंत मतदार जनजागृती रॅली व मानवी साखळी या उपक्रमाचे आज आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्सफूर्त प्रतिसाद होता. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या या रॅलीस हिरवी झेंडी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दाखवली. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे, स्वीपचे नोडल अधिकारी ओंकार देशमुख, समन्वयक बाबासाहेब उजगरे, गट शिक्षण अधिकारी समिंदर खान, राहुल चाटे यांची उपस्थिती होती.

## इंशाल्लाह दादाको चुनके देंगे; मोमीनपु-यात मुस्लिम बांधवांचा निर्धार!!

# मोमीनपुरा माझं होमग्राउंड म्हणणारा संदीप क्षीरसागर पाच वर्षात किती वेळा भेटला- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी- गेली अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे महापाप केले आहे. सत्तेचा ताम्रपट घेऊन क्षीरसागरांच्या पिढ्यानुपिढ्या बीडवर आपली मक्तेदारी चालवत आल्या आहेत व बीड विकासाचा खेळखंडोबा करत आहेत. मोमीनपुऱ्यातील मुस्लिम बांधवांच्या मतदानावर निवडणुन आलेल्या संदीप क्षीरसागरने मोमीनपुरा माझं होमग्राउंड आहे असा दावा ठोकला. मला मुस्लिम बांधवांना फक्त प्रश्न विचारायचा आहे की, गत पाच वर्षात संदीप क्षीरसागर





मोमीनपुऱ्यात किती वेळा आला? मुस्लिमांचे कोणच्या अडचणी सोडवल्या? मुस्लिम बांधवांनो हे क्षीरसागर सगळे एक आहेत. यांची खेळी लक्षात घ्या. यावेळी परिवर्तन घडवण्यासाठी मला साथ द्या. मी तुमच्या घरातदारात तुमच्यासमोर वाढलेला माणूस आहे अशा भावना अनिलदादा जगताप यांनी मोमीनपुऱ्यातील प्रचार सभेत व्यक्त केल्या. काल दि. 17 रोजी रात्री बीड शहरातील मोमीनपुरा भागात बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगाताप यांची सभा पार पडली. या सभेत अनिलदादा जगताप यांच्यासोबत संघर्षयोद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या टीममधील सदस्य देखील उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या मुस्लिम बांधवांच्या गरड्यात अनिलदादांची प्रचार सभा पार पडली. अनिलदादा जगताप यांच्या भावनिक अहवानानंतर इन्शाल्ला इसबार दादा आपको चुनके देंगे आशा प्रतिक्रिया व्यक्त करत मोमीनपुऱ्यात मुस्लिम बांधवांनी अनिलदादांना आमदार करण्याचा पक्का निर्धार केला असल्याचे दिसून आले.

## अनिलदादा मुस्लिम बांधवांसाठी सेक्युलर व्यक्ती- प्रा सुरेश नवले

मुस्लिम बांधवांनो, तुमच्या बहुमूल्य मतांचे विभाजन होऊ देऊ नका. तुमच्या गठ्ठा मतांचे विभाजन करून भाजपच्या फडणवीसांनी मुख्यमंत्री बनण्याचे षडयंत्र आखले आहे. या षडयंत्रास हाणून पाडा. स्वतःच्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देऊन सर्वसामान्य जनतेला स्वतःचा नेता आणि मा. जरांगे पाटील यांना स्वतःचा पक्ष मानणारे अनिलदादा जगताप बीड मतदार संघात तुम्हा मुस्लिम बांधवांसाठी सेक्युलर व्यक्ती आहेत त्यामुळे त्यांना येत्या २० नोव्हेंबर रोजी अनुक्रमांक १३ शिलाई मशीन या निशाणीवर मतदान करून आशीर्वाद द्या आणि बीड मतदार संघात परिर्वतन घडवून आणा असे माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांनी प्रचार भाषणात मत व्यक्त केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



## पुरुषांची सकारात्मक प्रतिमा प्रतिबिंबित झाली पाहिजे

(19 नोव्हेंबर- आंतरराष्ट्रीय पुरुष दिन विशेष.)

महिला दिनाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय पुरुष दिन दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. समाज आणि कुटुंबातील पुरुषांचे महत्त्व आणि योगदान साजरा करण्यासाठी हा दिवस आंतरराष्ट्रीय पुरुष दिन म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनामुळे समाजातील पुरुषांची सकारात्मक प्रतिमा प्रतिबिंबित होत असते. हा दिवस समाज, समुदाय, कुटुंब, विवाह, मुलांची काळजी आणि समाजातील पुरुषांचे योगदान साजरे करण्यावर भर देतो. या दिवशी समाजात पुरुषांविरुद्ध होत असलेल्या भेदभावावरही प्रकाश टाकला जातो. पुरुष दिनामुळे लैंगिक समानतेला प्रोत्साहन मिळण्यास मदत होते. पुरुषांचे लैंगिक शोषण-दमनही थांबविण्यात महत्त्वपूर्ण आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख... संपादक.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिन- आईएमडी हा पुरुषांना तोंड द्यावे लागणाऱ्या अनेक समस्यांसाठी जागतिक जागरुकता दिन आहे, ज्यात पालकांचा अलिप्तपणा, अत्याचार, बेघरपणा, आत्महत्या आणि हिंसाचार यांचा समावेश आहे, दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करण्याचे उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय पुरुष दिनमध्ये निश्चित केले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे सर्व सहा स्तंभ. मुलांचे आणि पुरुषांचे जीवन, कर्तृत्व आणि योगदान, विशेषत: राष्ट्र, संघ, समाज, समुदाय, कुटुंब, विवाह आणि बालसंगोपन यातील त्यांच्या योगदानाबद्दल साजरे करण्याचा हा एक प्रसंग आहे.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा इतिहास- सन १९९९ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगो येथील वेस्ट इंडीज विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक डॉ.जेरोम तेलकसिंग यांनी त्यांच्या वडिलांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन पहिल्यांदा साजरा केला. या दिवशी त्यांनी पुरुषांचे प्रश्न मांडण्यासाठी प्रोत्साहन दिले. दि.१९ नोव्हेंबर २००७ रोजी भारतात प्रथमच आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे महत्त्व- आंतरराष्ट्रीय पुरूष दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा आहे की, पुरूषांचे संघर्ष आणि ते वर्षानुवर्षे सामोरे जात असलेल्या सामाजिक परिस्थितीची माहिती समाजाला होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी, पुरुषांवरील भेदभावाबद्दल देखील बोलले जाते आणि चांगले लैंगिक संबंध निर्माण करण्याचे आश्वासन दिले जाते. पुरुषांचीही समाजात आणि कुटुंबात वेगळी ओळख असते. त्यांच्या योगदानाचे कौतुक करणे महत्त्वाचे आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला जातो.

मानव प्राण्यातील नर जातीला पुरुष असे म्हणतात. सर्वसाधारपणे प्रौढ- ३० किंवा त्यातून अधिक वय असणाऱ्या मानव नराला पुरुष असे संबोधले जाते. मुलगा हा सर्वनाम शब्द बाल्यावस्थेतील पुरुषांकरीता वापरला जातो. युवक हा शब्द तरुण पुरुषांसाठी वापरला जातो, ज्याचे वय १५ ते २९ दरम्यान असते.आज आंतरराष्ट्रीय पुरुष दिन आहे. पुरुषाची शारीरिक आणि मानसिक घडण स्त्रियांपेक्षा वेगळी असते. पुरुष आणि स्त्रियांची जनुकीय रचना वेगळी असते. स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त जगतात. त्यामुळे काही रोगांचं प्रमाण स्त्रियांमध्ये कमी तर पुरुषांमध्ये जास्त असतं. पुरुषांच्या आरोग्याविषयी काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊ या. टक्कल असेल तर हृदयरोगाचा धोका अधिक असतो. आपण पुरुष असाल आणि टक्कल पडलं असेल, केस अगदी चाळिशीच्या आत पांढरे केस झाले तर ही साधीसुधी बाब नाही. असे लक्षण असेल तर तुम्हाला हृदयरोगाची दाट शक्यता आहे असं सन २०१७मध्ये केलेल्या एका संशोधनातून समोर आलं आहे.

भारतात दोन हजार तरुण पुरुषांवर हे संशोधन करण्यात आलं. ज्या मुलांना हृदयरोगाच्या समस्या होत्या, त्यांना अवेळी टक्कल पडलं होतं किंवा पांढरे झाले होते. लठ्ठपणापेक्षाही हा मोठा धोका असल्याचं या संशोधनात समोर आलं. मात्र ब्रिटिश हार्ट फाऊंडेशनच्या मते हृदयरोगाशी इतर धोके ही तितकेच महत्त्वाचे आहेत. डॉ.माईक नॅप्टन बीबीसीशी बोलताना म्हणाले, "ज्या पुरुषांना टक्कल पडलंय किंवा ज्यांचे केस पांढरे झाले आहेत, त्या पुरुषांमध्ये हृदयरोगाचा धोका ओळखणं जास्त सोपं होतं." डॉ.कमल शर्मा या अभ्यासातले मुख्य संशोधक होते. ते म्हणाले, "अकाली वृद्धत्व हाही एक मुद्दा इथे असू शकतो. काही रुग्ण लवकर म्हातारे होतात आणि त्याचं प्रतिबिंब केसांमध्ये होणाऱ्या बदलात जाणवतं." युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडनचे प्राध्यापवक अलन ह्युजेस यांच्या मते असं संशोधन याआधी झालं आहे. वयोमानानुसार डीएनएत बदल होतात. त्यामुळेही हे बदल होतात. असंही ते म्हणाले.

सन २०१३साली जपानमध्ये ३७ हजार लोकांवर हा अभ्यास करण्यात आला होता. त्यात टक्कल पडलेल्या ३२ टक्के लोकांना हृदयरोग होता. पक्षाघाताचं प्रमाण पुरुषांमध्ये जास्त असल्याचं मत मेंदूविकारतज्ज्ञ डॉ.केदार टाकळकर यांनी व्यक्त केलं.

!! जागतिक पुरुष दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# बीड जिल्ह्यातील रुग्णालयांतील अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन, शासन आणखी एखाद्या जळीतकांडाची वाट पाहतेय का? निधीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

- -

बीड:- ( दि.१७ ) ३ वर्षांपूर्वी अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात आग लागुन ११ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता.अशा घटनांवर उपाययोजनेसाठी सरकारनेच आरोग्य विभागाकडून अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी प्रस्ताव मागविले होते. परंतु ३ वर्षांपासून हे प्रस्ताव शासन दरबारी धुळखात पडुन असुन बीड जिल्ह्यातील १७ रूग्णालयात अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी २८ कोटी रूपयांच्या अंदाजपत्रकासह निधी मागणीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवले आहेत परंतु अद्याप निधीबाबत आरोग्य विभाग आणि शासनाने आखडलेला हात सैल केला नाही त्यामुळे सरकार आणखी एखाद्या रूग्णालयातील जळीत कांडाची वाट पहात आहे काय असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला असुन बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये तातडीने अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीची तातडीने तरतूद करण्यात यावी अशी मागणी डॉ . गणेश ढवळे, शेख युनुस,शिवशर्मा शेलार यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री यांना केली असुन आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

सविस्तर माहितीस्तव



- - - -

कोविड संसर्ग काळात ता.६ नोव्हेंबर २०२१ मध्ये अहमदनगरच्या जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीत होरपळून नवजात बालक आणि ११ रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर शासकीय रुग्णालयातील इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी हा विषय ऐरणीवर आला होता. यानंतर आरोग्य विभागाने तातडीने सर्व जिल्हा आरोग्य प्रशासनाला तातडीने अग्निरोधक यंत्रणा उभारण्यासाठीचे अंदाज पत्रक आणि निधी मागणीचे प्रस्ताव मागविले. जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालय व अधिनस्थ आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रणा उभारणीसाठी २८ कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी मागणीचे प्रस्ताव आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आले. दुर्दैवी घटनेला आणि प्रस्ताव शासनाकडे पाठवुन ३ वर्षे लोटली आहेत.अशा गंभीर विषयातही सरकार निधी देण्यासाठी हात आखडता घेत असुन एकीकडे जनजागृती, जाहिराती, सरकारच्या जाहिरातींवर कोट्यवधीं रूपयांचा निधी सरकार खर्च करत असताना शासनाकडून अशा संवेदनशील विषयाकडे दुर्लक्ष होत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे.

अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव वरीष्ठांना पाठवला आहे :- डॉ.अशोक थोरात , जिल्हा शल्यचिकित्सक बीड

- - - -

बीड जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी अग्निरोधक यंत्रणा शसाठीच्या निधी निधी मागणीचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आलेला आहे. अद्ययावत आरोग्य यंत्रणा उभारणीसाठी निधी मागणीसाठी वरीष्ठांना पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी दिली.

गेल्या वर्षी अग्निरोधक यंत्रणेला श्रद्धांजली लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले :- डॉ.गणेश ढवळे

- - -

गेल्या वर्षी दि.४ डिसेंबर २०२३ रोजी बीड जिल्ह्यातील रुग्णालयाच्या इमारतींसाठी निधीची तरतूद करण्यात यावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्यासह शेख युनुस,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, धनंजय सानप यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर " अग्नि रोधक यंत्रणेला श्रद्धांजली"अर्पण लक्ष्यवेधी आंदोलन केले होते. मात्र वर्ष उलटूनही अद्याप निधीची तरतूद करण्यात आलीच नाही.

## दक्षिण मुखी हनुमान मंदिर पिंगळे गल्ली बीड येथेकाकडा भजनाची सांगता

बीड प्रतिनिधीकार्तिक महिना हा पवित्र महिना या महिन्यामध्ये गावातील मंदिरात दररोज पहाटे पाच पासूनच मंदिरामध्ये भावीक भक्तांची व भजनी मंडळांची गर्दी असते. पहाटेच काकड आरती सुरू होते ती भगवंताला निद्रेतून उठण्यासाठी विनंती अभंग गायले जातात आणि हरिनामस्म रण यामध्ये सकाळचे साडेसात वाजेपर्यंत सर्वजण मंजुळ स्वरात अभंग गायन करतात. या महिनाभर चालणा–या काकडा भजनामध्ये भारुड गवळण जोगी पांगुळ मुका बहिरा इत्यादी प्रकरणातील अभंग सर्व भजनी मंडळी गायन करतात यामुळे वातावरणात अधिकच प्रसन्नता असते आणि सकाळच्या मंजुळ प्रहरी सर्व भजनी मंडळ अगदी भक्तीमध्ये तल्लीन झालेले असतात .बीड येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर पिंगळे गल्ली येथे गेल्या कित्येक वर्षापासून दरवर्षी कार्तिक महिन्यामध्ये महिला मंडळ काकडा भजन करतात. सर्व महिला भजनी मंडळ अगदी वेळेमध्ये हजर असतात . पहाटेपासून सकाळी साडेसात वाजेपर्यंत त्याचा हा काकडा भजनाचा दररोजचा नियम आधी आजही आहे .आज या काकडा भजनाचां सांगता समारंभ कार्तिक पौर्णिमा अर्थात त्रिपुरा पौर्णिमेच्या मुहूर्तावर संपन्न झाला. पिंगळे गल्लीतील काकडा भजनाला इंदुबाई पिंगळे, शीलाताई ठाकूर, छायाताई गिराम ,नंदिता ताई वेदपाठक ,आनीताई पंडित, सुनिता सुसकर ,वृंदावनी साळुंके, भारतीताई ठाकूर ,आशाताई तापडिया, संगीताताई गिराम, सुमनताई गिराम, ठोंबरे मावशी, दोडके ताई, दोडके मावशी, शांताबाई तापडिया ,प्रतिभाताई डावकर ताई ,परळकर ताई यांच्यासह गल्लीतील अनेक माता भगिनी व महिला मंडळ दररोज या काकडा भजनाला हजेरी लावत होत्या. काकडा भजनाच्या सांगता निमित्ताने सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला .महिला भजनी मंडळ दररोज हजर असेत.आज महाप्रसादांने भजनाची सांगता झाली

# युवकांना रोजगार उपलब्ध झाला नाही; हे आमदाराचे अपयश–राजकिशोर मोदी

अंबाजोगाई: केज विधान सभा मतदार संघात एकही उद्योग न आल्याने युवकांना रोजगाराच्या संधीच उपलब्ध झाल्या नाहीत, हे विद्यमान आमदाराचे अपयश नव्हे का असा सवाल माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सोमवारी (ता.१८) एका कॉर्नर बैठकीत केला.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरात शहराच्या विविध भागात आयोजित बैठकीत बोलत होते. शहरातील रविवार पेठ, फालोअर्स क्वार्टर स्नेह नगर, झारे गल्ली या भागात मतदारांशी संवाद साधला

याप्रसंगी डॉ.नरेंद्र काळे, मनोज लखेरा, राजेंद्र मोरे, खालेद चाऊस, शेख रमीज, समियोद्दिन खतीब, अमोल लोमटे, गणेश मसने, सुनील वाघाळकर, हाजी खालेक, ॲड. इस्माईल गवळी, अमजद शेख आदींची उपस्थिती होती. महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे हे सर्वसामान्यांचे उमेदवार असून कार्यशील व्यक्तीमत्व आहे. त्यांना सर्व मतदारातून पाठबळ मिळू लागल्याने भाजपच्या पायाखालची वाळू सरकु लागल्याची टिकाही राजकिशोर मोदी यांनी केली. येणाऱ्या काळात नगर परिषदेच्या माध्यमातून घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्याचे धोरण अवलंबिनार असल्याचे मोदी यांनी सांगितले.

शेख रमीज, राजेन्द्र मोरे, महादेव आदमाने यांनी मागील पाच वर्षातील समस्या मांडल्या. युवा कार्यकर्ता संजय टिपरे यांनी प्रभागातील समस्या मांडल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण देशातील नागरिकांना एकच मतदान देण्याचा मूलभुत अधिकार दिला असून त्या अधिकाराचा वापर सर्वांनी करावा असे आवाहन डॉ. नरेंद्र काळे यांनी केले.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# सर्वसामान्य कुटुंबाचा आमदार होण्यासाठी मेहबूब भाई यांना निवडून द्या -खा.अमोल कोल्हे

शिरूरकासार:शिरूर लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असताना सोमवार ( ता.१८) रोजी शिरूर कासार मध्ये आष्टी मतदार संघाच्या माहाविकास आघाडीचे आधिकृत उमेदवार महेबुब शेख यांच्या प्रचार सभेला आलो आसुन एक सर्व सामान्य कुटुंबातील पोरगं आपल्या कष्टाने आपल्या कर्तृत्वानं जेव्हा महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर आपला आलेख निर्माण करत उद्याचा भावी आमदार होण्याची संधी त्याला द्या त्याला पवार साहेब मोठी जबाबदारी सोपविण्यार आसल्याने तुमच्या तालुक्याला मंत्री पदाची संधी चालून आली आसल्याने ती वाया घालु नका आसे अवाहान शहरातील सिद्धेश्वर संस्थान वर झालेल्या प्रचार सभेत खा.आमोल कोल्हे यांनी केले.व्यासपीठावर आष्टी पाटोदा शिरूर कासार मतदार संघाचे उमेदवार महेबुब शेख, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष शिवाजी राऊत, सतिष शिंदे, राम खाडे,शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, एम एन जाधव, आमोल तरटे,भास्कर केदार, बारीकराव खेंगरे,दिपक खोले, बाबुराव झिरपे,बाळासाहेब गायकवाड हे उपस्थित होते.कार्यक्रम चे प्रास्ताविक अॅड बी.बी. जाधव यांनी केले.पुढे बोलतांना खा.आमोल कोल्हे यांनी मेहबूब भाईच्या कारकिर्दीचा मी साक्षीदार आहे याचा मला अभिमान आणि त्यामुळे कोणतीही मोठी राजकीय परंपरा नाही वाढवडील आमदार खासदार मंत्री नाही सर्व सामान्य कुटुंबातला एक उच्च शिक्षित तरूण आसुन त्याला आमदार करत असताना त्या प्रत्येक सर्वसामान्य कुटुंबाचा तरुण आमदार होत असतो तर स्वप्न बघत असतो की होय आमदार मेहबूब शेख हा माझा प्रतिनिधी हा विश्वास तुमच्या प्रत्येकाच्या मनात जागत आणि आता मतदारसंघात दोनच दिवस राहिले हे दोन दिवस राहिले असताना अनेक ठिकाणी लक्ष्मी दर्शन सुद्धा होईल अशी चर्चा अनेक ठिकाणी लक्ष्मी दर्शन सुरू झाले जर सचोटीचा पैसा असेल तर आपण कधी वाटतो का त्यामुळे लक्ष्मी दर्शन करणारे जो काही लक्ष्मी दर्शन करत असतील तिथे



आधी समजून जायचं आहे का हा पहिला प्रश्न विचारायचा आणि दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे देऊन देऊन किती देतील जितकी देतील त्यामध्ये उद्या आपण म्हणतो एखादा माणूस धान्य विकतो एखादा माणूस किराणा विकतो एखादा माणूस अगदीच गरज पडली तर एखादा वावराचा तुकडा विकतो पण बीड जिल्ह्यातील स्वाभिमानी जनता शिरूर कासार आष्टी पाटोदा ची स्वाभिमानी जनता आपलं भविष्य आणि आपली स्वप्न विकणार नाहीत याची फक्त तुम्ही काळजी आणि म्हणूनच या निवडणुकीत आणखी वेगवेगळे जातीपातीचे विषय काढतील हे जातीपातीचे विषय काढत असताना या माणसाची जात मला माहिति या माणसाची जात ती मावळा या माणसाची जात ती लक्षणे मावळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने चालणारा म ावळ आहे कारण जेव्हा प्रलोभन होती जेव्हा दबा होता जेव्हा बाजारात निष्ठा विकली जाते की काय असं वाटत होतं तुम्ही आणि मी पाहिलं तर अंगावरचा शर्ट विकत घेत होतो पायाची चप्पल विकत घेता येतील मंत्री आणि आमदार विकले जातात विकत घेतले जातात ते जेव्हा आपण पाहत होतो तेव्हा हा पोरगा दिसत पवार साहेबांच्या बरोबर उभा राहिला आणि केव्हा या मातीची या माणसाचे निष्ठा असते तेव्हा या माणसाची जात ती तीन अक्षरी होते वाचली जातात आणि पत्रकार खरोखर माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला दुर्दैवाने कुणाच्या घरात घडू नये कुणाच्या घरात नातेवाईकाचा एखाद्या एक्सीडेंट झाला एक्सीडेंट झाला माणूस हॉस्पिटलमध्ये नेला हॉस्पिटलमध्ये नेल्यानंतर डॉक्टरने घ्यायला सांगितला आत्ताच्या आत्ता रक्ताची गरज आहे रक्त देणारा भेटला त्यांनी जर रक्त दिले तर त्याचा जीव वाचणारे त्याची जात आणि त्याचा धर्म कधी विचारतात त्याची जात आणि त्याचा धर्म सह्याद्रीचा काळा पाशाने जिथे छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र घेऊन स्वराज्यात स्वप्न ही निवडणूक महाराष्ट्र म हाराष्ट्राची भाकरी खाऊन गुजरातची चाकरी करणा–या महायुतीच्या नेत्यांना त्यांची जागा दाखवायची असेल तर बळकट पंजात मशाल पेटवून स्वाभिमानाची तुतारीच वाजली पाहिजे याची पूर्ण गाठ मराठी बांधून ठेवा महबूब शेख या मतदार संघात उभे मी आवर्जून सगळ्या मतदारसंघांमध्ये सभा सोडून इथं आलोय त्याचं कारण म्हणजे अमोल कोल्हे या मतदार संघात उभाये या ठिकाणी आपण सगळ्यांनी सेवा समोरून येणार आहे भविष्यात मोठे नाव मोठी जबाबदारी या माझ्या मित्राला मिळणारे हा मी तुम्हाला याची खात्री देतो आणि त्यासाठी तुम्हाला प्रत्येकाला विनंती करतो की मेहबूब भाई म्हणजे डॉक्टर अमोल कोल्हे म्हणजे शरदचंद्रजी पवार साहेब उभे आणि मेहबूब भाई म्हणजे इथल्या प्रत्येक सर्वसामान्य कुटुंबाचा आमदार होण्यासाठी संधी द्या आसे अवाहान त्यांनी केले.या वेळेस उमेदवार महेबुब शेख यांनी आपले विचार व्यक्त केले.या वेळेस मोठ्या प्रम ाणावर नागरिक उपस्थितीत होते शहरात भव्यदिव्य रॅली काढण्यात आली. कार्यक्रम चे सुत्रसंचालन सागर गाडेकर यांनी केले.

## अनिल देशमुखांवरील हा हल्ला म्हणजे स्टंटबाजी; भाजपने आरोप फेटाळले

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या नागपूरमध्ये गाडीवर दगडफेक झाली आहे. अनिल देशमुख यांच्यावर काटोल जलालखेडा मार्गावर बेलफाट्याजवळ अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात अनिल देशमुख यांच्या गाडीची काच फुटली आहे. तसंच अनिल देशमुखांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. या दगडफेकीत देशमुख जखमी झाले आहे. त्यांच्यावर काटोलमधल्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मी निधी देतो तुम्ही कमी पडू नका", अशी आतली बातमी अजित



पवारांनी आपल्या भाषणात दिली. अजित पवारांचं मतदारांना आवाहन काय?"स्वतःचं सरकार असताना सव्वा रुपया दिला आहे आणि आता आम्ही देतोय तर टीका करताय. 20 तारखेला कोण आपल्या कामाचा आहे? याचा विचार करून शंकरला संधी द्या. संग्राम थोपटे यांनी 15 वर्षात जी कामं केली असतील त्याची बेरीज करा आणि जेवढं येईल त्याच्या पेक्षा जास्त निधी मी या पंचवार्षिकमध्ये मतदारसंघाला देईन, निवडून द्या", असं आवाहन अजित पवारांनी यावेळी मतदारांना केलं. पोलिसांकडून गाडीची तपासणी अनिल देशमुख यांच्या ज्या गाडीवर दगडफेक झाली ती गाडी tv9 वर... पारडसिंगा जवळील बेल फाटा परिसरात अंधाराचा फायदा घेत दगडफेक करण्यात आली. गाडीची समोरची काच अनिल देशमुख बसले होते. त्या भागाकडून पूर्णतः ब्रेक झाला आहे. मोठा दगड काचेवर पडला त्यामुळे काच फुटली आहे. पोलिसांकडून गाडीची तपासणी केली जात आहे.

## मनोज जरांगे पाटील हिंदुत्व तोडणारा राक्षस कालीचरण महाराजांची अतिशय खोचक टीका

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर पहिल्यांदाच स्वयंघोषित महाराज कालीचरण यांनी अतिशय खोचक शब्दांत टीका केली आहे. कालीचरण महाराजांनी टीका करताना मनोज जरांगे पाटील यांचं प्रत्यक्ष नाव घेतलेलं नाही. पण त्यांचा पूर्ण रोख मनोज जरांगे यांच्याच दिशेला होता. त्यांनी मनोज जरांगे यांचा उल्लेख थेट राक्षस असा केला. त्यांच्या टीकेचा व्हिडीओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापलेलं असताना आता कालीचरण महाराजांच्या वादग्रस्त वक्तव्याने नवं वाकयुद्ध रंगण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे स्वयंघोषित महाराज कालीचरण यांच्याकडून मराठा मोर्चाची खिल्ली उडवण्यात आली आहे. लाखो मुंबईमध्ये गेले, ते खातील काय, टॉयलेटला जातील कुठे हे टेन्शन होतं का? असं कालीचरण महाराज म्हणाले आहेत. थडग्यावर चादर



चढवणारा त्यांचा नेता हा हिंदुत्व तोडणारा राक्षस, असा घणाघात कालीचरण महाराज यांनी केला. कालीचरण महाराजांनी नाव न घेता मनोज जरांगे यांचा उल्लेख राक्षस असा केला आहे.कालीचरण महाराज नेमकं काय म्हणाले होते? "आता एक आंदोलन सुरु झालं होतं ते तुम्हाला माहिती आहे का, हिंदू-हिंदूंमध्ये फूट पाडायचं. अशी हवा होती त्या आंदोलनाची..., अशी हवा..., लाखो लोकं मुंबईत. टेन्शन काय होतं माहिती आहे? एवढे लोकं जेवतील कुठे आणि टॉयलेटला जातील कुठे? मला टेन्शन आलं की, त्यांनी आता जावं कुठे?", असं कालीचरण महाराज म्हणाले. "कुठला त्यांचा नेता थडग्यावर चादर चढवेल. आला रे चादरवाला आला रे आला. हे जाती-जातीच्या आरक्षणाच्या गोष्टी नाहीत तर हिंदुत्व तोडण्यासाठी निघालेले राक्षस आहेत. राक्षस!", असा घणाघात कालीचरण महाराजांनी केला. त्यांच्या या टीकेवर आता मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या समर्थकांकडून काय प्रतिक्रिया देण्यात येते, ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. कालीचरण महाराजांची नेमकी टीका कशावर?मनोज जरांगे पाटील यांनी काही महिन्यांपूर्वी मोठं आंदोलन केलं होतं.

## शेवटच्या दिवशी ठाकरे बंधूचा एकमेकांवर तीव्र घणाघात, राज म्हणाले गद्दार, तर उद्धव म्हणाले, गुनसे

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा आता थंडावल्या आहेत. पुढच्या 30 ते 35 तासांनी ऐतिहासिक अशा क्षणांना सुरुवात होणार आहे. विधानसभेच्या 2024 च्या निवडणुकीसाठी मतदानाला सुरुवात होणार आहे. त्याआधी आज प्रचाराच्या रणधूमाळीचा शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवशी राज्यभरात प्रचाराचं रणकंदन माजलेलं बघायला मिळालं. या निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीदेखील एकमेकांवर टीका-टीप्पणी केली. त्यांनी आजच्या शेवटच्या प्रचारसभांमध्ये दोन्ही भावंडांनी एकमेकांवर अतिशय टोकाची टीका केली. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना गद्दार म्हटलं. तर उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावाच्या मनसे पक्षाला गुनसे गुजरात नवनिर्माण सेना म्हणत घणाघात केला. राज




ठाकरे काय म्हणाले?
"एका माणसाने सगळ्या पक्षाची वाट लावली. अनेक लोकं निघून गेली, त्या लोकांना ही लोकं गद्दार म्हणाले. अरे गद्दार तर घरात बसला आहे ज्याने पक्षाशी गद्दारी केली", असा घणाघात राज ठाकरे यांनी केला. "या माणसाच्या वागणुकीमुळे पहिल्यांदा नारायण राणे शिवसेनेतून बाहेर पडले, मग मी बाहेर पडलो, यानंतर एकनाथ शिंदे बाहेर पडले. पण जो माणूस बाळासाहेबांना त्रास देवून जो फुटून पहिला गेला त्या माणसाला हा माणूस मातोश्रीवर जेवायला बोलवतो. म्हणजे बाळासाहेबांना त्रास दिला ते सोडून द्या. त्याचं यांना काही देणंघेणं नाही, बाकीचे शत्रू आहेत", अशा शब्दांत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव ठाकरे यांच्याकडून प्रत्युत्तरराज ठाकरे यांच्या टीकेला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिलं. "एक पक्ष आहे कोणातातरी, सुरुवातीला त्याचा झेंडा वेगळा होता. आता झेंडा बदललेला आहे. निशाणी सुद्धा इंजिन कधी इकडे तर कधी तिकडे. पहिलं नाव होतं मनसे, आता गुनसे झालंय. म्हणजे गुणांची वाणवा पण गुजरात नवनिर्माण सेना, जो महाराष्ट्राचा घात करेल. जो कुणी महाराष्ट्राचा घात करेल त्याला गुनसे साथ देणार हे त्यांनी ठरवलेलंच आहे. म्हणजे ध्येय नाही, धोरण नाही, दिशा नाही, काय वाट्टेल ते बोलायचं", अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं.

# शहरातून भव्य प्रचार रॅली आणि विराट सभेने डॉ. ज्योती मेटे यांचा विजय निश्चित

## अखिल भारतीय मराठा महासंघ, संभाजी ब्रिगेड नंतर विनोद पाटलांनी ही जाहीर केला पाठिंबा.

## विनायकाला श्रद्धांजली वाहण्यासाठी या ज्योतीला संधी द्या - डॉ. ज्योती मेटे



बीड (प्रतिनिधी) प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी बीडमध्ये चांगलेच शक्ती प्रदर्शन केले. बार्शी नाका ते नगर नाका अशी भव्य रॅली त्यांनी काढली रॅलीचा समारोप शिवसंग्राम भवन येथे विराट सभा घेऊन करण्यात आला. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य चाहत्यांच्या जोरावर मी विजयी होणार याची मला खात्री आहे. असे प्रतिपादन त्यांनी या सभेत केले यावेळी मंचावर शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, सलीम पटेल, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद , अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब सोळुंके, बालघाटवरील मराठा सेवक बळवंत कदम, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड विधानसभा प्रभारी सुभाष जाधव , सुनील शिंदे, जकी सौदागर, आदी उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपण बीड मतदारसंघात दौरा करताना लोकांनी आणि माय माऊल्यानी अत्यंत उत्साहात स्वागत केले. त्यांचा उत्साह हा मतदानाचा दिवशी मतपेटीतून देखील दिसणार आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचा वसा आणि वारसा ज्योती मेटे पुढे घेऊन जात आहे. हे लोकांच्या मनाला जास्त भावले आहे. माझी पाटी कोरी असल्याने माझ्याबद्दल बोलण्यासारखे काहीच नसल्याने विरोधकांनी जाणीवपूर्वक षडयंत्र रचून माझ्यावर आरोप करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना मी एकच सांगू इच्छिते कमरेखाली वार करण्यापेक्षा समोरासमोर लढा मी महिला असले तरी कमजोर नाही. असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

### अखिल भारतीय मराठा महासंघ संभाजी ब्रिगेड नंतर विनोद पाटलांनी ही जाहीर केला पाठिंबा

डॉ.ज्योती मेटे यांना काल अखिल भारतीय मराठा महासंघ आणि संभाजी ब्रिगेडने जाहीर पाठिंबा दर्शवल्यानंतर मराठा आरक्षणासाठी न्यायालयीन लढा लढणारे मराठा सेवक विनोद पाटील यांनी देखील बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती मेटे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आपण हा पाठिंबा देत असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे.

### विनायकाला श्रद्धांजली वाहण्यासाठी या ज्योतीला संधी द्या - डॉ. ज्योती मेटे

प्रचार दरम्यान मतदाराला साद घालताना विनायकाला श्रद्धांजली वाहण्यासाठी या ज्योतीला संधी द्या असे भावनिक उद्गार त्यांनी यावेळी काढले यावेळी बोलत असताना डॉ. ज्योती मेटे या भाऊक झाल्याचे पाहायला मिळाले आपल्या भाषणादरम्यान नेत्याला भाऊक झाल्याचे पाहून उपस्थितांचे डोळे देखील पाणवले.----------

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मला पंकजा ताईला खास धन्यवाद द्यायचे, तू फार मोठं काम केलंस, ठाकरे काय म्हणाले?




शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज मुंबईतील बीकेसीत जाहीर सभा पार पडली. या सभेत उद्धव ठाकरे यांनी भाजप नेते पंकजा मुंडे यांचा उल्लेख करत आभार मानले. त्यावर पंकजा मुंडे काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. "जे संजय राऊत बोलले की, 23 तारखेला आपण जिंकणार आहोतच आणि राज्यभर फटाके फुटणार आहेत. पण जर महाझुटी जिंकली तर गुजरातला फटाके वाजतील. मी सगळ्या गुजराती वर्गाला आणि व्यापारी वर्गाला दोषी धरत नाही. पण पंकजा मुंडे काल बोलल्या आहेत. तो व्हिडीओ सुद्धा आहे. मला पंकजा ताईला खास धन्यवाद द्यायचे आहेत. पंकजा ताई तू फार मोठं काम केलंस, आमच्या महाराष्ट्राच्या डोळ्यावरील पट्टी तू काढलीस. जशी आमच्या चंद्रचूड साहेबांनी न्याय देवतेच्या डोळ्यांवरची पट्टी काढली आणि स्वत: च्या डोळ्यांवर बांधली होती, तशी तू आमच्या महाराष्ट्राच्या डोळ्यांवरची पट्टी काढली आहे", असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. "पंकजा मुंडे यांनी काय सांगितलं आहे की, भाजपचं काम म्हणजे त्यांचे शब्द वेगळे आहेत. मी तुम्हाला त्याचा फक्त अर्थ सांगतो. भाजपचं काम लय भारी असतं बघा. आपल्याकडे बुथ किती आहेत? तर 90 हजार. प्रत्येक बुथवरती भाजपचं दक्षता पथक आहे. पथक म्हणजे एक पेक्षा अधिक माणसं. एक माणूस जरी धरला तरी 90 हजार बुथवर 90 हजार माणसं. 2 धरली तर 1 लाख 80 हजार, 3 धरती तर त्याच्या पटीत. सगळी माणसं गुजरातमधून भाजपने इकडे महाराष्ट्रात आणली आहेत, म्हणजे आपल्यावर नजर ठेवायला. ते आज नजर ठेवायला आले आहेत, उद्या त्यांचा आपली मुंबई आणि महाराष्ट्र बळकवण्याचा डाव आहे. हे तर फेक नरेटिव्ह नाही ना? हे उद्धव ठाकरे पंकजा मुंडे बोलल्यानंतर बोलत आहे", असं उद्धव ठाकरे म्हणाले. 'बॅग कंपनीचा मला ब्रँड ॲम्बेसिडर बनवा'"याचा अर्थ असा की, इथे भाजप हरलेली आहे. इथे भाजप राहिलेली नाही. विशेष म्हणजे महाराष्ट्रात राहणाऱ्या भाजप प्रेमींवर भाजप नेतृत्वावर विश्वास नाही. मग तो मराठी माणसावर नाही, गुजरातीवर नाही, उत्तर भारतीयांवर नाही.

### "माझी बॅग तपासली

"माझी बॅग तपासली, हरकत नाही. पण हे जे लोकं बॅग तपासत आहेत, ते रात्री राहतात कुठे? त्यांचा खर्च कोण करतोय? ते ज्या बॅगा घेऊन फिरत आहेत त्या बॅगेतील ढोकळे आणि शेव-पापड्या कुठून आणले आहेत? कोणासाठी फिरत आहेत, कुणाला काय वाटत आहेत? याआधीच्या निवडणुकांमध्ये मतदारांवर लक्ष ठेवण्यासाठी बाहेरच्या राज्यातील फौज अद्याप आणलेली नव्हतं", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# अनिल देशमुखांवरील हल्ल्यानंतर काटोल पोलीस ठाण्याबाहेर कार्यकर्त्यांचा ठिय्या

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर हल्ला झालाय. नरखेड येथील शेवटची प्रचारसभा आटोपून ते काटोलच्या दिशेला जात होते. या दरम्यान काटोल जलालखेडा मार्गावर बेलफाट्याजवळ अनिल देशमुख यांच्या गाडीवर अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात अनिल देशमुख यांच्या डोक्याला दुखापत झाले आहेत. अनिल देशमुख यांच्या डोक्यातून रक्त वाहत असल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. या घटनेनंतर अनिल देशमुख यांना उपचारासाठी नागपुरातील मॅक्स हॉस्पिटलमध्ये आणण्यात आलं आहे.



तर दुसरीकडे काटोल पोलीस ठाण्याबाहेर अनिल देशमुखांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे. अनिल देशमुख यांच्या कार्यकर्त्यांनी काटोल पोलीस ठाण्याबाहेर जोरदार घोषणाबाजी करत ठिय्या मांडला आहे. अनिल देशमुखांवर हल्ला करणाऱ्यांना पोलिसांनी अटक करावी, अशी मागणी आंदोलकांकडून केली जात आहे. या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवारांनी या घटनेवर निषेध नोंदवला आहे.

तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे यांनी अनिल देशमुखांवरील हल्ल्यानंतरचे त्यांचे फोटो आणि व्हिडीओ ट्विट करत भूमिका मांडली आहे. "प्रचार संपवून परत जात असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिलजी देशमुख यांच्यावर काही समाजकंटकांनी भ्याड हल्ला केला. ही अतिशय दुर्दैवी आणि संतापजनक घटना आहे. आम्ही सर्वजण या हल्ल्याचा निषेध करतो", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.

# माझी निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची

## तुतारी वाजवणारा माणूस चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा:आ.संदीप क्षीरसागर यांचे आवाहन

## बीडच्या विकासासाठी संदीपभैय्यांना प्रचंड मतांनी विजयी करा- खा. बजरंग सोनवणे

## विरोधकांना धडकी भरवणा-या चौसाळ्यातील विराट विजयी संकल्प सभेने आ.संदीप क्षीरसागर यांच्या विजयावर केले शिक्कामोर्तब

चौसाळा (प्रतिनिधी) माझी ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची आहे. बालाघाटवरील मतदारांनी प्रचाराच्या शेवटची विजयी सभा घेऊन मला आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे उद्याच्या २० नोव्हेंबरला आपण सर्व मायबाप जनतेने बीड मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी अनुक्रमांक ३ "तुतारी वाजवणारा माणूस" या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आ. संदीप क्षीरसागर यांनी केले तर बीड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाची विचारधारा सर्व मतदारांना आपलेसे करणारी आहे.मतदारसंघात ठिकठिकाणी आ. संदीप क्षीरसागर यांना जनतेने स्वीकारले असून आपण सर्वांनी जनसेवेसाठी कायम उपलब्ध असणाऱ्या आ. संदीप भैय्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्ष महाविकास आघाडी व मित्र पक्षाचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ सोमवारी दुपारी चौसाळा येथे जाहीर सभा घेण्यात आली. या सभेला खासदार बजरंग सोनवणे, माजी आमदार सुनील धांडे, उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह बालाघाटावरील राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि चौसाळा जि. प.गटातील मतदार बंधू,भगिनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आ. संदीप क्षीरसागर म्हणाले, बीड लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत माझ्या प्रचारानिमित्त



चौसाळा येथे भव्य विजयी संकल्प सभा पार पडत असल्याचा आणि आपण सर्वांनी इतक्या विराट संख्येने या सभेला दर्शवलेल्या उपस्थितीवरून मला समाधान वाटत आहे. मागील पाच वर्षात मतदार संघाच्या विकासासाठी सातत्याने काम केले नागरिकांचे प्रश्न सोडवले.शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी यंत्रणा उभारली. याचेच फळ म्हणून आज ही निवडणूक धनशक्तीविरुद्ध जनशक्तीची झालेले असताना तुम्ही सर्वजण माझ्यासोबत खंबीरपणे पाठीशी उभा राहिला आहात. या सभेला महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, नेते व पदाधिकारी, तरुण कार्यकर्ते, वयस्कर मंडळी तसेच कार्यकर्ते, माता भगिनींनी दाखवलेली अलोट गर्दी विरोधकांची धडकी भरवणारी असेल हे नक्की.मायबाप जनतेची झालेली ही अफाट गर्दीच, माझी निवडणूक जनतेने हाती घेतली असल्याचे सांगून जाते. आता येत्या २० तारखेला अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा एकदा आपल्या सर्वांची सेवा करण्याची संधी द्या असे आवाहन आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रचंड जनसमुदायासमोर केले.

उपस्थितांशी संवाद साधताना खासदार बजरंग सोनवणे यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या कार्यशैलीचे आणि लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी मागील पाच वर्षात केलेल्या कामाचे कौतुक करत मतदारसंघातील जनतेने पुन्हा एकदा त्यांना आपला प्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठवावे असे आवाहन केले.यावेळी इतर पदाधिकारी कार्यकर्त्यांनीही मनोगत व्यक्त करत संदीप क्षीरसागर यांच्या पाठीशी मतदार खंबीरपणे उभे राहतील असा विश्वास व्यक्त केला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com